## रे.मु.नं.१९९/१९९५ मधील निशाणी १९७ वरील आदेश :-

१. सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जामध्ये वादीचे कथन असे की,

वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द वाटपासाठी दाखल केलेला आहे. वादीचा दावा मंजुर झालेला होता व त्यानंतर प्रतिवादींनी मा.जिल्हा न्यायालय, संगमनेर यांच्याकडे रे.अ.नं.१७/२००२ दाखल केले. सदर अपिलामध्ये प्रतिवादी नं.४ तर्फे प्रतिवादी नं.४अ ते ४ड हे हजर झाले आणि त्यांना अपिलात पार्टी करुन घेण्यात आले. प्रतिवादी नं.४अ ते ४ड यांच्यातर्फे शोभा बाबासाहेब वाघ हिची Next friend म्हणून नेमणूक करावी असा अर्ज दिला व त्यासोबत काही कागदपत्रे दाखल करण्यात आले. सदर कागदपत्रामध्ये मयत सुंदराबाईचे तथाकथित मृत्यूपत्र, सुंदराबाईने तहसिलदार यांना दिलेला अर्ज, फेरफार नं.९२४२ व खरेदीखते दाखल करण्यात आली. सदर कागदपत्रावरुन मा. जिल्हा न्यायालय यांनी दावा रे.मु.नं.१९९/१९९५ चा हुकूमनामा पुन्हा फैलावर घेण्याचा आदेश केला.

३. सदरचा दावा वादीने वाटपासाठी करतांना त्याची वडीलोपार्जित मिळकतीबरोबरच सुंदराबाई व रभा व त्यांची मुले यांच्या अविभक्त कुटुंबातील वडीलोपार्जित मिळकतीतून व एकत्र हिंदू अविभक्त कुटुंबाने केलेल्या मिळकतीच्या उत्पन्नातून सुंदराबाईच्या नांवे खरेदी घेतलेल्या जमिनीचा देखील समावेश केलेला आहे. सदर जमिनीचा गट क्र.१९७, १५६, ६३ व ५४६ असा आहे. या मिळकतीपैकी गट नं.६३ सोडून बाकीच्या मिळकती हया बाबासाहेब रंगनाथ वाघ यांच्या नांवावर असल्यामुळे व त्या मिळकती एकत्र, अविभक्त हिंदू कुटुंबाच्या असल्याने त्या दाव्यात समाविष्ट केलेल्या आहेत. रभाच्या मृत्यूनंतर कुटुंबाचा कर्ता म्हणून रंगनाथ रंभाजी याचे नांवावर ७/१२ ला नोंद झाली. रभा व सुंदराबाई या दोघांच्या नांवावर व इतर प्रतिवादी यांच्या नांवावर असलेल्या सर्व मिळकती एकत्र करुन वादीचा दावा मिळकतीतील असलेला १/४ हिस्सा कोर्टाने पूर्वीच्या दाव्यात मंजुर करुन हुकूमनामा झालेला होता. अपिलामध्ये प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांनी दाखल केलेली तथाकथित मृत्यूपत्र व तहसिलदार यांचा अर्ज व फेरफार नं.९२४२ या सर्व कागदपत्रांची माहिती वादीला प्रथम अपिलात झाली. सदरच्या दाव्यामध्ये दाखल असलेले तथाकथित मृत्यूपत्र तहसिलदार यांचेकडे दिलेला अर्ज व त्यावरुन

झालेला फेरफार वादीला मान्य व कबूल नाही. सबब दावा कलम ४च्या पुढे ४अ च्या पुढे ''तथाकथित मृत्यूपत्र व तहसिलदारांचा अर्ज यांची वादीला प्रथम माहिती प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांनी अपिलात जेंव्हा कागदपत्रे दाखल केली तेंव्हा प्रथम माहिती मिळाली. प्रतिवादीने दाखल केलेला तथाकथित मृत्यूपत्राची मुळ प्रत दाव्यात दाखल केलेली नाही. तथाकथीत मृत्यूपत्र व अर्ज हे वादीला मान्य नाही तसेच ते बेकायदेशीर असून त्याचे आधारे प्रतिवादी क्र.४ मयत बाबासाहेब व त्यांची मुले यांचे नांवावर झालेले दावा मिळकतीचे हस्तांतरण हे बेकायदेशीर आहे तसेच फेर नं.८६७, १०२४ व १०२९ हे वादीवर बंधनकारक नाहीत. ही मिळकत अविभक्त एकत्र हिंदू कुटुंबाच्या उत्पन्नातून खरेदी केलेली असल्याने ही सर्व मिळकत अविभक्त एकत्र हिंदू कुटुंबाची आहे असे समजून वाटपात एकत्र धरण्यात यावी'' अशी दुरुस्ती करण्याची न्यायालयाला विनंती केलेली आहे.

४. वादीने सदरच्या अर्जामध्ये सदरहू दुरुस्ती ही प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांनी अपिलामध्ये तथाकथित कागदपत्रे दाखल केल्यामुळे वादीस करणे भाग पडत आहे तसेच दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये कोणत्याही स्वरुपाचा बदल होत नाही असे सांगून दुरुस्तीसाठी परवानगी देण्याची विनंती केलेली आहे.

५. प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांनी सदर अर्जावर त्यांचा जबाब **नि.१९९** वर दाखल केलेला आहे. सदर जबाबामध्ये असे नमूद केले की, दाव्यामध्ये व विनंती कलमामध्ये वादीस काय दुरुस्ती पाहिजे हे स्पष्ट न करता वादीने केलेला अर्ज हा सकृतदर्शनी रद्द होण्यास पात्र आहे. प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांनी सर्व कागदपत्रे हे अपील कोर्टात दाखल केलेली होती. सदर कागदपत्रामध्ये मृत्यूपत्र, फेरफार यांचा समावेश होता व प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांचे वडील प्रतिवादी क्र.४ हे मेंटली डिसऑर्डर असल्याने त्यांच्यामार्फत महत्वाचा पुरावा येवू शकला नाही हे प्राथमिक दृष्टया सिध्द झाल्याने कोर्टाने प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांना पुरावा देण्याची संधी देण्याच्या हेतूने दावा रिमांड केलेला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांनी दाव्यात कैफियत देवून कागदपत्र दाखल केलेले आहेत, त्या वरुन न्यायालयाने जादा मुद्दे काढलले आहेत. तेंव्हा वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी तोंडी पुरावा देणे नाही अशी पुरसिस दिली. त्यानंतर प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांचा पुरावा सुरु झालेला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ चा उलटतपास झालेला आहे आणि त्यांनतर वादीने बरेचशी उलटतपासणी घेतलेली आहे. वादीने

सदरचा अर्ज हा दाव्यातील कमतरता (lacuna) भरुन काढण्यासाठी केलेला आहे. वादीला प्रतिवादीने हजर केलेल्या सर्व कागदपत्रांची माहिती अपिलातच होती. अपिलात कागदपत्रे दाखल केल्यापासून तीन वर्षे होवून गेली तरी वादीने दाव्यात दुरुस्ती मागणी केलेली नाही. कोणत्याही दाव्यात दुरुस्ती करतांना मुदती बाहेर गेलेल्या कारणांची दुरुस्ती दाव्यात करता येत नाही. त्यामुळे सदरची दुरुस्ती वादीला आता मागता येणार नाही. सबब वादीचा अर्ज रद्द व्हावा अशी न्यायालयाला विनंती केलेली आहे.

६. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी सदर अर्जावर त्यांचा जबाब **नि.२००** वर दाखल केलेला आहे. सदर जबाबामध्ये असे नमूद केले की, सदर दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा पुरावा बंद झाला असून प्रतिवादी नं.४ चा पुरावा चालू आहे. प्रतिवादी क्र.४ यास प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या वतीने उलटतपासाचे काम पूर्ण झालेले आहे. त्यानंतर वादीने सुध्दा बरीच उलटतपासणी घेतलेली आहे आणि त्यानंतर वादीने सदरचा दावा दुरुस्तीचा अर्ज दिलेला आहे. वादीचा सदरचा दावा दुरुस्तीचा अर्ज हा व्हेग स्वरुपाचा असून चुकीचा आहे. वादीला दाव्यामध्ये काय दुरुस्ती करुन मागायची आहे आणि कोणत्या ठिकाणी दुरुस्ती करुन मागायची आहे याचा बोध होत नाही. वादीने सदरचा अर्ज हा कमतरता (lacuna) भरुन काढण्यासाठी दाखल केलेला आहे. सबब वादीचा अर्ज रद्द करावा अशी न्यायालयाला विनंती केली आहे.

७. वादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

८. मी दाव्यामध्ये दाखल असलेले कागदपत्रांचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे वादीचा अर्ज व त्यावरील म्हणणे देखील वाचले. सदरचे दाव्यामध्ये मा. जिल्हा न्यायाधीश यांच्या न्यायनिर्णयाची प्रत दाखल केलेली आहे. सदरच्या न्यायनिर्णयामध्ये प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांच्यातर्फे दाखल असलेल्या सर्व कागदपत्रांचा उल्लेख न्यायनिर्णयात करण्यात आलेला असून सदर न्यायनिर्णय दिनांक १४/२/२०१२ रोजी झालेला आहे. सदरच्या न्यायनिर्णयानुसार प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांच्याकडून दाव्याची कैफियत दिनांक १०/०४/२०१२ रोजी दाखल करण्यात आलेली आहे. त्यानंतर माझे पूर्वाधिकार यांनी दिनांक ०१/०७/२०१४ रोजी ज्यादा मुद्दे सदरच्या दाव्यात काढलेले आहेत. वादीने दिनांक ०४/०८/२०१४ रोजी त्याला कोणताही ज्यादा पुरावा दयायचा नाही अशी पुरसिस नि.१४० वर दाखल केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्र. १क, १ड, २ व ३ यांचेतर्फे देखील त्यांना पुरावा देणे नाही अशी पुरसिस अनुक्रमे नि.१४१ व

१४२ ला दिनांक ११/०८/२०१४ रोजी दाखल करण्यात आलेले आहे. त्यानंतर दिनांक ११/०८/२०१४ रोजी प्रतिवादी क्र.४ब चे पुराव्याचे शपथपत्र नि.१४३ वर दाखल करण्यात आलेले आहे. प्रतिवादी क्र.१अ ते १ड व प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्यातर्फे दिनांक ०३/११/२०१४ रोजी उलटतपास घेण्यात आला व त्यानंतर ११/११/२०१४ रोजी वादीतर्फे उलटतपास सुरु करण्यात आला. सदर दाव्यामध्ये त्यानंतर दिनांक २५/११/२०१४ ही तारीख देण्यात आली. रोजनाम्यानुसार दोन्ही पक्षांच्या तोंडी विनंतीवरुन काम तहकूब केल्याचे दिसत आहे. त्यानंतर सदर दाव्यात ०१/१२/२०१४ ही तारीख देण्यात आली. त्या दिवशी नि.१९६ वर वादीने मुदतीचा अर्ज दिलेला आहे. सदरचा अर्ज मंजुर करण्यात आला व त्यानंतर ०५/१२/२०१४ रोजी वादीतर्फे सदरचा दुरुस्तीचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. या सर्व पार्श्वभुमीवर मला दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-६, नियम-१७ येथे उध्दृत करणे आवश्यक वाटते.

> ***As per Order- 6, Rule 17 of the Code of Civil Procedure*** *- the Court may at any stage of the proceedings allow either party to alter or amend his pleadings in such manner and on such terms as may be just, and all such amendments shall be made as may be necessary for the purpose of determining the real questions in controversy between the parties ;*
>
> ***Provided that*** *no application for amendment shall be allowed after the trial has commenced, unless the Court comes to the conclusion that in spite of due diligence, the party could not have raised the matter before the commencement of trial.*

९. सबब वरील दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-६, नियम-१७ नुसार वादीने केलेल्या अर्जाचा विचार करणे आवश्यक आहे. सदरच्या दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.४अ ते ४ड हे हजर झाले. त्यांनी त्यांची कैफियत दिली व त्या नंतर ज्यादा मुद्दे काढण्यात आले. वादी व

प्रतिवादी क्र.२ ते ३ यांनी ज्यादा पुरावा देणे नाही अशी पुरसिस दिली आणि त्यानंतर प्रतिवादी क्र. ४ब चा पुरावा सुरु झालेला आहे. सदरच्या दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.४अ ते ४ड यांनी सर्व कागदपत्रे ही अपिलातच दाखल केली होती हे वादीने देखील मान्य केलेले आहे. अशी सर्व परिस्थिती असतांना देखील वादीने सदर दाव्यात प्रतिवादींनी कैफियत दिल्यानंतर दुरुस्ती का करुन घेतली नाही या बाबत त्याच्या अर्जामध्ये कोणताही खुलासा केलेला नाही. दाव्याची चौकशी सुरु झाल्यानंतर जर दुरुस्ती करायची असेल तर वादीने त्याचे यथायोग्य कारण (due diligence) देणे आवश्यक आहे. सदरच्या दाव्यामध्ये वादी मागत असलेली दुरुस्ती ही सर्व बाबी माहिती असतांना देखील योग्य वेळी का केली नाही ? याचा कोणताही खुलासा वादीतर्फे करण्यात आलेला नाही. वादीने सदरचा अर्ज हा त्याला अपिलात कागदपत्रांची माहिती झाल्यानंतर जवळजवळ दोन वर्षांनी चौकशी सुरु झाल्यानंतर दिलेला आहे आणि सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ च्या तरतुदीमध्ये (proviso) येत नसल्यामुळे रद्द करण्यात येत आहे व पुढील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

संगमनेर.

( वृ. ज. कोरे )
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
संगमनेर

दिनांक : २०/०१/२०१६.